| | |
|---|---|
| MHKO160002782023 | <u>रे.क.नं. ३८/२०२३ मधील नि. ५ खालील आदेश</u> |

१. वादीं यांनी प्रस्तुतचा अर्ज, सोबतचे प्रतिज्ञापत्र, दिवाणी प्रक्रीया संहिता, १९०८ चा नियम ३९, आदेश १,२ अन्वये प्रतिवादीं विरूध्द तूर्तातूर्त मनाई मिळण्यासाठी दाखल केला आहे. वादींनी दावा मिळकतीचे वर्णन परिच्छेद १ मध्ये सविस्तर नमूद केलेले आहे, त्या मिळकतीला यापुढे 'दावा मिळकत' असे संबोधण्यात येत आहे.

२. वादींनी पुढे असे कथन केले की, दावा मिळकतीं या त्यांनी नोंदणीकृत दस्ताने खरेदी केलेल्या आहेत. त्यांचे नोंदणीकृत् दस्त क्रं. ९६१/२००४, ९५८/२००४, ९५७/२००४ असे आहेत. त्या खरेदीपत्रानुसार फेरफार क्रं. १२८८ ने वादीं यांचे नांव दावा मिळकतींच्या ७/१२ पत्रकी नोंद झालेले आहे. दावा मिळकतीं असलेल्या संपूर्ण गटाची व त्यावरील सर्व भूखंडाचे उपअधिक्षक भूमी अभिलेख शाहुवाडी यांचेमार्फत दि. २२/०४/२०१३ रोजी मोजणी करुन मोजणी कर्मचा-यांनी दाखवलेल्या हद्दीवरुन वादींने सिमेंट पोल लावून घेतले होते व दावा मिळकतींच्या हद्दी खरेदीपत्रावेळी खरेदी देणार यांनी दाखवले प्रमाणेच असलेचे ठरवणेत आले होते. सदर मोजणीवेळी यातील प्रतिवादीं हे दावा मिळकतींचे पूर्व बाजूचे लगतचे हिस्सेदार असलेने त्यांना नोटीस जावून त्यांचे समक्ष मोजणी झाली आहे.

३. वादींनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादीं यांची गट क्रं. १३० व १३२ च्या शेत मिळकतीं दावा मिळकतींना लागून आहेत. तसेच प्रतिवादींचे रहाते घर देखील हे दावा मिळकतींचे जवळ असून प्रतिवादीं हे दावा मिळकतींमध्ये अतिक्रमण करुन वादींने लावलेले ते सिमेंटचे पोल प्रतिवादींनी काढून टाकले व दावा मिळकतीं बेकायदेशीरपणे ताब्यात घेणेचा प्रयत्न करीत आहेत. सदर बाबत वादींनी प्रतिवादींना "हद्दीवरुन पोल काढून टाकू नका व आमच्या मिळकतीत येवू नका," असे सांगितले नंतर ही "मिळकत माझी आहे, तुम्ही इकडे यायचे नाही" अशी धमकी दिली. तसेच "तुम्हांला जातीवाचक शिवीगाळ केलेच्या खोटया केसमध्ये अडकवतो व म्हातारपणी खडी फोडायला लावतो," अशी धमकी दिली. वादीं पैकी

क्रं. ४ या महिला आहेत व एक वादी वयोवृध्द आहे. त्याचा गैरफायदा घेवून प्रतिवादींने वादींना दि. ०५/०२/२०२३ रोजी धमकी दिली की, "मिळकतीत आलेस विपरीत घडेल". म्हणून वादींनी कायम मनाईसाठी दावा दाखल करुन, त्यामध्ये सदरचा तात्पुरता मनाईचा अर्ज दाखल करुन तो मंजूर करणेची विनंती केली.

४. प्रतिवादीं यांनी नि. १३ सोबत त्यांचे म्हणणे दाखल करुन, दाव्यातील व अर्जातील मजकूर नाकारला आहे. दावा मिळकतींत त्यांनी अतिक्रमण करणेचा प्रयत्न केला नाही असे म्हंटले. वादीं प्रतिवादींचे मालकीचे गट क्रं. १३० व १३२ मध्ये घुसखोरी करणेचा प्रयत्न करीत आहेत. दावा मिळकतीं या वादीं यांच्या मालकीच्या असून त्यामध्ये प्रतिवादीं यांनी कधीही हक्क सांगितला नाही. वादीं नमूद करतात त्याप्रमाणे दावा मिळकतींत कधीही सिमेंटचे खांब लावले नव्हते. वादीं हे या न्यायालयाची दिशाभूल करणेचा प्रयत्न करीत आहेत. प्रतिवादींना त्रास देणेसाठी वादीनीं अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणतेही कारण घडलेले नाही. वादीं यांना प्रथमदर्शनी केस नाही. ते स्वच्छ हाताने मे. कोर्टात आलेले नाहीत. सदरचा अर्ज मंजूर केल्यास वादीं सदर आदेशाचा गैरफायदा घेवून प्रतिवादींच्या मालकीच्या गट क्रं. १३० व १३२ मध्ये घुसखोरी करणेचा प्रयत्न करील म्हणून प्रतिवादींनी सदरचा अर्ज नुकसान भरपाई मिळून नामंजूर करणेची विनंती केली.

५. मी वादीं, प्रतिवादीं यांचे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला, अभिलेखावरील वादकथन, दाखल कागदपत्रे यांचे अवलोकन केले आहे. वादीं, प्रतिवादीं यांचे परस्परविरोधी वादकथन, अभिलेखावरील कागदपत्रे, युक्तीवाद या सर्व घटनांवरून प्रस्तुतचा अर्ज निकाली करण्यासाठी खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत. मी सदर मुद्दयांचा निश्कर्ष कारणमिमांसेसह नमूद करीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी केस वादीं यांचे बाजूने आहे का ? | होकारार्थी |
| २. | सोईस्कर्तेचा तूला वादीं यांचे बाजूने आहे का? | होकारार्थी |
| ३. | तूर्तातूर्त मनाई न दिल्यास वादीं यांचे नुकसान होणार आहे का ? | होकारार्थी |
| ४. | आदेश ? | अर्ज मंजूर करण्यात येत आहे |

## कारणमिमांसा -

## मुद्दा क्र. १ ते ३ करीता -

६. दोन्ही बाजुंच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादींनी नि. ३ सोबत नि. ५ चे पुष्ठयार्थ महेंद्र चंद्रकांत वायकूळ यांचे शपथपत्र नि. ११ वर दाखल केले आहे. प्रतिवादीं यांनी नि. १५ सोबत कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

७. दोन्ही पक्षकारांचा विस्तृत युक्तिवाद ऐकल्यानंतर व कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर असे दिसते की, वादीं यांनी दावा मिळकतीं हया नोंदणीकृत खरेदी दस्ताने खरेदी घेतलेल्या आहेत. तेंव्हा पासून त्यांची मालक या नात्याने दावा मिळकतींवर कब्जे वहिवाट आहे. तसेच त्यांनी उपअधिक्षक भूमी अभिलेख शाहुवाडी यांचे मार्फत मोजणी करुन कर्मचा-यांनी दाखवलेल्या हद्दीवरुन वादींनी सिमेंटचे पोल लावून घेतल्याचे प्राथमिकता दिसते. त्या मोजणीचेवेळी मिथून रामचंद्र कांबळे हे लगतधारक हे हजर होते. सदरची मोजणी ही सरकारी अधिका-यामार्फत झालेली आहे. तसेच दावा मिळकतींच्या ७/१२ पत्रकी वादीं यांची नांवे नोंद झालेली आहेत. तसेच प्रतिवादीं यांनी दावा मिळकतीं या वादीं यांच्या मालकीच्या मिळकतीं असून त्यामध्ये प्रतिवादीं यांचा कधीही हक्क सांगितला नसलेचे तसेच तसा प्रयत्न सुध्दा केला नसलेचे प्रतिवादीं यांनी त्यांचे लेखी कैफियतीमध्ये सांगितलेले आहे. त्यामूळे वादीं यांनी प्रथमदर्शनी केस सिध्द केलेली आहे.

८. प्रतिवादीं यांनी कथन केले की, वादीं हे त्यांच्या गट क्रं. १३० व १३२ या मिळकतींमध्ये घुसखोरी करण्याचा प्रयत्न करत आहे. परंतू त्याबाबत प्रतिवादीं यांनी कोणतीही दाद मागितली नाही. प्रतिवादीं यांनी दाद मागितली नसली तरीही वादीं हे प्रतिवादीं यांच्या सदर गट मिळकतींमध्ये घुसखोरी करु शकत नाहीत.

९. प्रतिवादी क्र २ यांनी नि.१६ सोबत खालीलप्रमाणे न्यायनिवाडे हजर केले आहेत.

१) 1990 (3) BCR -567 – सदरचे न्यायनिवाड्यामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

"Interim injunction cannot be granted on cock bull story, it can be granted only after careful consideration."

२) AIR 1996 – Kalkatta 279 – सदरचे न्यायनिवाड्यामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

"A party who comes with un clean hands – Interim injunction should not be granted".

३) 2011 (126) – DRJ – 70 IG Builders & Promoter Vs. Ajit Singh – सदरचे न्यायनिवाड्यामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

"No injunction can be granted when suit is frivolous & vexatious."

वरील न्यायनिवाड्याचे अवलोकन केल्यास असे दिसते की वादी यांची केस चालण्यास पात्र आहे. वादीची केस पाहता सदरची केस प्राथमिकतः खरी व बरोबर असल्याचे दिसते. सबब, वरील प्रतिवादीने सदरकामी हजर केलेले न्यायनिवाडे सदरचे केसमध्ये प्रतिवादीस सहाय्य करीत नाहीत.

१०. शेवटी, न्यायालयास असे निदर्शनास येते की, वादीं यांनी प्रथमदर्शनी केस सिध्द केलेली आहे. प्रतिवादीं यांनी वादीं यांच्या दावा मिळकतींचे क्षेत्र ताब्यात घेणेचा प्रयत्न करत असल्याचे वादींनी प्रथमदर्शनी सिध्द केले आहे त्यामूळे प्रतिवादींचे सदरचे प्रयत्न थांबवणे गरजेचे आहे. न्यायाचा तराजू हा वादींचे बाजूने असलेचे दिसते. तात्पुरता मनाईचा आदेश दिला नाही तर वादीं यांचे अपरिमीत असे नुकसान होणेचा संभव आहे. त्यामूळे सदरचा अर्ज मंजूर करणे गरजेचे आहे म्हणून वादींनी सकृतदर्शनी केस सिद्ध केल्यामुळे न्यायालय मुद्दा क्रमांक १ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्रमांक ४ साठी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्ज निशाणी क्रं. ५ हा मंजूर करण्यात येत आहे.

२. दाव्याचा अंतीम निकाल लागेपर्यत प्रतिवादीं अगर तर्फे इसमांनी वादींचे मालकी व वहिवाटीच्या दावा अर्जी कलम १ मध्ये वर्णन केलेल्या दाव मिळकतींमध्ये बेकायदेशीरपणे घुसखोरी करु नये, तसेच वादींच्या दावा

मिळकतींतील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा करु नये अशी प्रतिवादीं व तर्फे इसमां विरुध्द तुर्तातुर्त मनाई आदेश पारीत करणेत येतो.

३. खर्चाचा आदेश दाव्याचे अंतिम आदेशावर अवलंबून राहील.

(खुल्या न्यायालयात घोषीत)

Digitally signed by Amol Shriram Shinde
Date: 2023.06.13 10:56:42 +0530

(अमोल श्रीराम शिंदे )
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
शाहुवाडी मलकापूर जि. कोल्हापूर

स्थळ- शाहुवाडी
दि. ०८/०६/२०२३